# श्रमिक जनता विकास संस्था व डेव्हलपमेंन्ट सपोर्ट टिम पुणे

# शेतकरी महिला व पुरुष कार्यशाळा

श्रमिक जनता विकास संस्था व डेव्हलपमेंन्ट सपोर्ट टिम पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्रमिक संस्थेच्या मेढा प्रशिक्षण केंद्रात दिनांक २८ मार्च २०२५ रोजी " पर्यावरणीय बदल अनुरूप पारंपारीक शेती व जैवीक शेतीची आवश्यकता काळाची गरज" या विषयावर जावळी तालुक्यातील निवडक शेतकरी व महिला शेतकरी यांचे साठी कार्यशाळा संपन्न झाली .

या कार्यशाळेसाठी डेव्हलपमेंन्ट सपोर्ट टिमचे अध्यक्ष मा .शिरीष कुलकर्णी साहेब श्रमिक संस्थेचे अध्यक्ष श्री आदिनाथ ओंबळे अफार्म पुणे संस्थेचे कृषी संचालक मा.श्री शांताराम साकोरे साहेब शेती उद्योगजकता तज्ञ मा . श्री. विवेक अत्रे साहेब तालुका कृषी अधिकारी मा.श्री . प्रकाश राठोड साहेब तसेच खंडाळा गो शाळा च्या संचालिका पुनमताई राऊत यांनी पुर्ण दिवस मार्गदर्शन केले

कार्यक्रमाचे सुरुवातीला उदघाट्न व सर्वांचे स्वागत करणेत आले. श्री . आदिनाथ ओंबळे यांनी श्रमिक संस्थेचे सन १९९५ पासूनचे उपक्रम व जावली तालुक्यातील पर्जन्य ,शेती ,जनावरे यांची सद्यस्थिती मांडली .

मा. शिरीष कुलकर्णी यांनी जल ,वायु परिवर्तन व महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दुष्परिणाम सांगितले, मागील काही वर्षांत पाऊसाचे प्रमाण हे बदलत आहे, कधी कमी ,कधी अधिक पाऊस ,पुर तर कधी कोरडा दुष्काळ या सगळ्याचे महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील जावली ,माण या तालुक्यामध्ये जास्त दुष्परिणाम पहायला मिळतात शेतीतील उत्पादन, पशुधन, उपजीविका साधने हि कमी होताना दिसत आहेत यावर मात कशी करता येईल यासाठी या मेळाव्याचे आयोजन आज केले आहे.

यानंतर श्री शांताराम साकोरे यांनी जैविक शेतीची आवश्यकता व त्याचे विविध घटक या विषयी माहिती दिली सध्या शेतीत रासायनिक खतांचे व औषधांचे होत असलेले परिणाम सांगितले, त्यांनी PPT द्वारे पारंपारिक, जैविक ,शाश्वत शेती म्हणजे काय व त्याची आज गरज का आहे तसेच शेतीला नैसर्गिक निविष्ठांचे होणारे फायदे सांगितले अतिशय अभ्यासू माहिती त्यांनी सविस्तर आणि सोप्या भाषेमध्ये दिली . दशपर्णी काढा ,गांडूळखत, शेणखत ,अमृतपाणी इ. कसे तयार करायचे व कसे वापरायचे हे सांगितले

दुपारच्या सत्रामध्ये जावली तालुका कृषी अधिकारी यांनी शासनाचे जैविक शेतीबाबत धोरण तसेच केंद्र व राज्य शासनाच्या याबाबत असलेल्या योजनांची माहिती दिली, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पुढे येऊन जैविक शेती करणेचे आवाहन केले.

लघु उद्योजकता तज्ञ श्री. विवेक अत्रे  जैविक शेती पूरक उपजीविका साधने कशी निर्माण करता येतील याची अनेक उदाहरणे देऊन मुद्देसूद मांडणी केली त्याचबरोबर आपल्या मालावर प्रक्रिया करून त्याची गुणवत्ता सुधारुन मूल्यवर्धन करणे किती गरजेचे  आहे हेही अनेक दाखले देऊन सांगितले

गो शाळा संचालक पूनम राऊत यांनी गोआधारित शेती, जैविक शेतीचे प्रयोग, अनुभव अगदी तळमळीने मांडले, स्वतः जैविक शेती करत असलेचे त्यांनी अनेक दाखले दिले, रासायनिक शेतीमुळे शेतीचे होणारे नुकसान त्याच बरोबर मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती देऊन  लोकांनी जैविक शेतीकडे वळले पाहिजे याबाबत कळकळीचे आवाहन केले

जावली तालुक्यातील विभागातून 100 अनुभवी महिला पुरुष शेतकरी सक्रिय सहभागी झाले होते , कार्यक्रमाचे शेवटी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ञांनी उत्तरे दिली

कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्रमिक संस्थेच्या सचिव नेहा कुलकर्णी यांनी केले.  श्री लहु तरडे श्री.संपत सुर्वे श्री. सुनिल गोळे व सौ उषा उंबरकर , प्रतिभा देशमुख , सौ.विजया साळुंखे ,संगीता परिहार यांनी कार्यशाळा योग्य रितीने पुर्ण होण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले .

सर्व उपस्थितांचे आभार शिरीष कुलकर्णी यांनी मांडले व कार्यशाळे चा समारोप केला






डेव्हलपमेंट सपोर्ट टीम पुणे व
श्रमिक जनता विकास संस्था मेढा (जि.सातारा)
शेतकरी संवाद
दिनांक 28 मार्च 2025 रोजी
अनुभवी व

